माझे पती श्री. बापू राघू वाघमोडे यांना

**सविनय अर्पण**

# प्रकरण पहिले

## मराठी साहित्यातील आत्मचरित्र : एक विचार

# प्रकरण पहिले

# मराठी साहित्यातील आत्मचरित्र : एक विचार

**आत्मचरित्राचे स्वरुपः**

आत्मचरित्र हा एक स्वतंत्र वाङ्.मय प्रकार आहे. पूर्वी आत्मचरित्र हे चरित्रांचे एक भावंड मानले जात असे. त्याचा अभ्यास व समावेश चरित्रातच केला जात असे. आत्मचरित्राचा विकास, वाढ झाली ती चरित्राच्या अंगानेच. समीक्षकांनी, टीकाकारांनीही त्याकडे एक स्वतंत्र वाङ्.मय प्रकार म्हणून पाहिले नाही. त्यामुळे आत्मचरित्र वाङ्.मय प्रकारासंदर्भात बरीच मतमतांतरे आणि काही अपसमजही आढळतात.

लघुकथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, ललित, गद्य यासारखा वाङ्.मय प्रकार म्हणून आत्मचरित्राचे वर्गीकरण झालेले आढळत नाही. ग्रंथालयात आत्मचरित्राचा समावेश हा चरित्रातच केला जातो आणि तेथे त्याचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात येते. खरे तर चरित्राचा विषय चरित्राचा लेखक, चरित्राचा कालखंड याचा अभ्यास केला तर तो एक स्वतंत्र वाङ्.मय प्रकार आहे. 'चरित्र' हा दुसऱ्याने नायकाचा घेतलेला शोध आणि 'आत्मचरित्र' हा 'स्व' ने 'स्व' चा घेतलेला आंतरिक आणि बाह्यांग शोध होय. ''आत्मचरित्राच्या विषयाचे मूळ स्वरुप आत्मशोध घेणे, तो विशद करणे हेच असते'', हे आनंद यादव यांचे मत योग्यच आहे. आत्मचरित्रकाराने मनपूर्वक लेखन केले तर स्वत:च पुष्कळ काही सांगून जातात. अनेक वाटांवर त्याचा आपोआप प्रकाश पडतो. एखादा अपवाद वगळता ती आदर्श ठरतात. एखादा काळ विशिष्ट वाङ्.मय प्रकाराने गजबजलेला असतो. या दृष्टीने मराठी साहित्यातील आजची स्थिती पाहिली तर या कालखंडाला 'आत्मचरित्रयुग'म्हणावेसे वाटते. सामान्य असामान्यांची आत्मचरित्रे भराभर बाहेर पडत आहेत. ती मराठी वाङ्.मयात महत्वपूर्ण स्थान मिळवत आहेत. मराठी साहित्यात महानुभावीय वाङ्.मयात व संतसाहित्यातील कथात्मक अभंगातून त्रुटीत स्वरुपात आत्मचरित्र दिसून येते.

आता काळ बदलत चालला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला प्राधान्य मिळू लागले आहे. 'स्व'ची जाणीव होऊ लागली आहे. आजचा सर्वसामान्य माणूसही काहीसा आत्मलक्षी (in ward looking) बनत चालला आहे. स्वत:विषयी, स्वकालाविषयी, स्वकालीन वातावरणाविषयी जागरूक

असणारी सुशिक्षित व्यक्ती निश्चितपणे आत्मचरित्र लिहू शकते. अलीकडे स्वतंत्र वाङ्‌मय प्रकार मानण्याइतके दर्जेदार आत्मचरित्र लेखन होऊ लागले आहे. त्यामुळे केव्वळ चरित्राचा एक भाग म्हणून आत्मचरित्राचा अभ्यास करुन चालणार नाही. एक स्वतंत्र वाङ्‌मय प्रकार म्हणून पाहणे गरजेचे आहे. आत्मचरित्र हा साहित्यप्रकार चरित्रलेखनाहून भिन्न आहे. त्यांची निर्मिती प्रेरणा, स्वरुप भिन्न आहे. त्याची वैशिष्ट्ये वेगळी आहेत. हे प्रकर्षाने जाणवल्यानंतर काही विचारवंतांनी आत्मचरित्राची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला.

आत्मचरित्राचे स्वरुप समजण्यासाठी आत्मचरित्राच्या विविध व्याख्या केलेल्या आढळतात.

'Encyclopedia Britannica' त आत्मचरित्राचा "Autobiography the account of an individual human life written by the subject himself"[2] असा अर्थ दिला आहे.

"Autobiography: Art and practice of writing a narrative of one's own life"[3] असा The Universal Dictionary of the English Language मध्ये आत्मचरित्राचा अर्थ सापडतो. "Autobiography or narrative of one's life written by oneself"[4] असा आत्मचरित्राचा अर्थ Webster ने केला आहे.

Encyclopedia, universal Dictionary, Webster यांच्या वर्णनावरुन आत्मचरित्र या शब्दाचा मुख्यार्थ तेवढा कळतो. परंतु त्यावरुन आत्मचरित्राचा आवाका कळणारी व्याख्या स्पष्ट होत नाही. Prof. D.G. Naik यांच्या मते "The details of any given life, therefore, when accommodated in a story or narrative inevitably take a shape of form, in literary terminology is called the form of autobiography"[5] या व्याख्येतून आत्मचरित्रास आवश्यक असलेले इतर पैलू सिध्द होत नाहीत. ''स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र''[६] अशी आत्मचरित्राची व्याख्या डॉ. सदा. कऱ्हाडे यांनी केली आहे. स्वजीवनाचे तटस्थवृत्तीने अवलोकन करणे, प्रांजळ निवेदन करणे ह्या आत्मचरित्रास आवश्यक बाबी यातून स्पष्ट झाल्या आहेत. पण आत्मचरित्रास आवश्यक त्या घटनांची निवड, त्यांची कलात्मक मांडणी या आत्मचरित्रातील महत्वपूर्ण बाबी या व्याख्येतून व्यक्त होत नाहीत. त्यामुळे आत्मचरित्राची ही व्याख्याही परिपूर्ण वाटत नाही. ''आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व

तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वत: लेखकाने लेखन-रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय.''[७] अशी आत्मचरित्राची व्याख्या रा.ग. जाधव यांनी 'मराठी विश्वकोशा'च्या दुसऱ्या खंडात दिलेली आहे. 'आत्मचरित्र' या शब्दाची संज्ञा स्पष्ट करताना आनंद यादव यांनी आत्मचरित्राचा वाङ्.मयीन क्षेत्रातील अर्थ सांगितला आहे. ''मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली त्या वाटचालीतील माझी, स्थितीगती म्हणजे सुखदु:खे, आशा आकांक्षा, विकास-विस्तार, भावसत्ये, कृतकर्मे आणि या सर्वातील यशापयश, धडपड यांचा 'मी' केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख किंवा नकाशा''[८].

या सर्व व्याख्यावरुन ''आत्मचरित्र म्हणजे तटस्थपणे आवश्यक त्या बाबींची निवड करून प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' च्या भूतकाळाचा शोध वर्तमानकाळातील जडण-घडण आणि भविष्याविषयी आस्था यांचे वर्णन म्हणजे आत्मचरित्र होय.'' अशी आत्मचरित्राची व्याख्या करता येईल. तटस्थता, घटनांची निवड, प्रांजळ निवेदन, कलात्मक मांडणी हे घटक त्यातून व्यक्त होतात त्यामुळे ही व्याख्या समर्पक म्हणण्यास हरकत नाही. व्यापक अर्थाने विचार करावयाचा झाल्यास कुणाच्याही जीवनाचा आणि काळाचा स्वलिखित वृत्तांत आत्मचरित्र या सदरात बसू शकेल. ललित निबंध, प्रवास वर्णन आणि आत्मचरित्रात्मक कादंबरी या सर्व लेखन प्रकारापेक्षा आत्मचरित्र हा वाङ्.मयप्रकार बराच वेगळा आहे. सिंहावलोकनाच्या भूमिकेने जीवनातील विशिष्ट अशा कालखंडाचे किंवा कधी कधी संपूर्ण जीवनाचे निवेदन आत्मचरित्र करीत असते. पण या निवेदनाला काही कलात्मक आकार यावा अशी ही इच्छा असते. तसा तो प्रयत्नही करतो. भोवतालच्या घटना व्यक्ती, यांच्या संबंधाने परीक्षण करण्याला आत्मचरित्रात विशेष वाव असतो. इतिहासातील काटेकोरपणा व तटस्थपणा आत्मचरित्राकडून अपेक्षिला जातो. वाङ्.मयातील आत्मानुभूती व आत्मीयता आत्मचरित्राकडून अपेक्षिली जाते त्यामुळे हा साहित्य प्रकार लेखकास आव्हानात्मक ठरतो.

केवळ 'स्व' जीवनातीलआणि स्वकाळातील घटना, व्यक्ती आणि प्रसंग यांचे उल्लेख आणि संकलन म्हणजे आत्मचरित्र नव्हे. प्राचीन मराठीतील काही कवी आपल्या लेखनात ग्रंथलेखनकालाचा, गुरुपरंपरेचा, कुटुंबातील व्यक्तींचा, स्वकालीन इतर ग्रंथकारांचा उल्लेख करताना आढळतात. या

उल्लेखास आत्मचरित्र म्हणता येणार नाही. प्रसंगविशेषी प्रगट झालेले त्रोटक आत्मपर उद्‌गार म्हणजे आत्मचरित्र नव्हे. त्यास काही नावच द्यावयाचे झाल्यास स्वविषयक वृत्तकथन असे देता येईल.

**आत्मचरित्राची वैशिष्टये:**

आत्माविष्काराची प्रवृत्ती माणसाच्या ठिकाणी सर्वत्र असून ती मूलभूत अशी आहे. आत्माविष्करण (self expression) आणि आत्मप्रकटीकरण (Self Revelation) हा माणसाचा स्थायीभाव आहे. अगदी कल्पनारम्य वाङ.मयातही आत्मप्रकटीकरण नाही असे होत नाही. आत्मचरित्र हा आत्माविष्काराला आणि आत्मप्रकटीकरणाला अत्यंत अनुरूप आणि पूरक असा वाङ.मय प्रकार आहे. या वृत्तीतून असंख्य आत्मचरित्रांची निर्मिती झाली आणि होत आहे असे असले तरी त्यापैकी फार थोड्यानाच साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त होते. 'आत्मचरित्र' लेखन हे त्या व्यक्तीच्या बहिर्मुख वृत्तीचे निदर्शक वाटते, असे काही आत्मचरित्रांच्या अनुषंगाने वाटते. हा वाङ.मय प्रकार यशस्वीपणे हाताळण्यासाठी लेखकाच्या अंगी कलात्मक गुणांची तर आवश्यकता असतेच पण त्यासोबत खोटा विनय सोडून वस्तुनिष्ठ आत्मपरिक्षणाची गरज असते.

**स्वत:चे भान स्वत:चा विसर**

आत्मचरित्राचा लेखक आणि विषय हा एकच असल्यामुळे लेखकाला आपल्या व्यक्तित्वाकडे तटस्थ, दूरस्थपणे, टीकात्मक दृष्टीने पाहता आले पाहिजे. त्याने स्वत:ला विसरलेही पाहिजे आणि त्याला स्वत:चे भानही असले पाहिजे. अशा दोन परस्पर विरोधी गोष्टींची सांगड घालता यायला हवी हेच या वाङ.मय प्रकारास आवश्यक असणारे मोठे कौशल्य आहे. त्याविषयी असे म्हटले की, 'It is this peculiar nature of thus from is of art which makes it unique among all froms of literdy art.

कठोर आत्मपरीक्षण हे आत्मचरित्राचे फार महत्वाचे वैशिष्टये आहे. या दिव्यातून जाणे कठीण असल्यामुळे फारसे लेखक या वाङ.मयप्रकाराच्या वाटेला जात नाहीत आणि या कठोर आत्मपरीक्षणामुळेच सत्य आणि कलात्मक आत्मचरित्र कितपत लिहिले जाईल अशी भिती आद्रें मौरॉज यांना वाटते. भावना आणि विचार, शास्त्र आणि साहित्य, सत्य आणि कल्पित यांचा कलात्मक सुरेख

संगम साधता आला पाहिजे. आत्मचरित्र निवेदन म्हणजे तारेवरची कसरत. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाह याबद्दल पदोपदी दक्षता बाळगावयाची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभावविशेषांचे गुण दोषांचेआणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते. 'Scientific autopsy and rigorous post mortem'[9] असे निकेलसने आत्मचरित्राचे लक्षण सांगितले आहे हे मत अगदी समर्पक आहे. आत्मचरित्रकाराने प्रामाणिकपणाने व तटस्थवृत्तीने आत्मपरीक्षा करुन आपल्या अंत:करणात खोल दडून ब सलेले विचार व भावना वाचकांपुढे खुल्या करुन दाखविल्या पाहिजे. स्वत: लेखकच आत्मचरित्राचा विषय असतो हे वर पाहिलेच कलावंत सूर्याखालचे सगळे काही अगदी स्पष्टपणे पाहू शकतो आणि त्याचे तितकेच प्रामाणिक वर्णनही करु शकतो. पण स्वत:विषयी काही सांगावयाची पाळी आली की आत्मप्रेमाच्या भावनेमुळे तो आंधळा होतो. अशा वेळी स्वत: विषयी प्रगट सत्य तो सांगू शकेलच असे नाही. उलट त्याची आत्मविषयक भावना प्रबल होण्याची शक्यता आहे. आत्मचरित्रातील सत्य हे अंत:करणातून तावून सुलाखून निघाले पाहिजे.

प्रत्येक मानवी कृतीचा जन्म माणसाच्या आत्मविषयक जाणिवेतून होत असतो. या जाणिवेला आणि स्वत:ला विसरून स्वत:कडेच तटस्थपणे पहात गतजीवनातील स्मृती आठवणे आणि त्याचवेळी त्यांचे कलात्मक लेखनही करणे ही गोष्ट बरीचशी कठीण आहे असे परस्परविरोधी गुण एकाच व्यक्तीच्या ठिकाणी असण्यासाठी त्या लेखकाजवळ काही वेगळ्याच सामर्थ्यांची आवश्यकता असते. सत्याला सामोरे जाणे म्हणावे तितके सोपे नसते. जर कोणताही कलाप्रकार सत्याचे परिणामकारक दर्शन घडवू शकतो, हे मान्य केले तर आत्मचरित्र हा वाड.मय प्रकार या दृष्टीने सर्वात समर्थ वाड.मय आहे, हे मान्य करावे लागेल.

मानवी व्यक्तित्वाचा शोध घेण्यासाठी आत्मचरित्राचा विविधांगी उपयोग होऊ शकतो याची जाणीव आजच्या कलावंतांना होऊ लागली आहे. माणसाविषयीच्या आपल्या ज्ञानात समजूतीत आत्मचरित्र हा वाड.मय प्रकार फार मोठी भर घालणार आहे. कारण मानवी जीवनातील विविधांगी स्वभावाचे दर्शन घडविणे हाच मुळी त्याचा हेतू आहे. माणसाच्या विचारकर्तृत्वासोबत या वाड.मय

प्रकारची वाढ होत जाते. त्यामुळे 'चरित्र' लेखनाचे निरनिराळे प्रयत्न म्हणजे साहित्याच्या कक्षा वाढविण्याचा प्रयत्न करणेच होय. आत्मचरित्राचा अभ्यास प्रामुख्याने मानवी मनाशी आणि मानवी व्यक्तित्वाशी निगडीत असल्याने तत्वचिंतनात्मक आणि मानसशास्त्रीय ग्रंथांची मदत घेणेही या अभ्यासास आवश्यक कहाणी असते, तशी ती मानवी मनाची स्वभावाचीही साक्ष असते. या संदर्भात डब्लु.एच. डन यांचे मत प्रत्ययकारी वाटते. 'Autobiography impinges upon the realm of psychology; autobiographies are psychological documents of the greatest importance'[10] माणूस आणि मन यांच्या अनन्य साधारण संबंध असतो. मनाशिवाय माणूस असू शकत नाही. त्यामुळे 'डन' यांचा विचार अगदीच समर्पक आहे. मनोगाहन व कठोर आत्मपरीक्षण हे फार थोड्या लोकांना साधते म्हणूनच आत्मचरित्र हा सर्वात कठीण वाङ्.मय प्रकार ठरतो.

## आत्मचरित्र आणि आत्मकथन मधील साम्यभेद:

आधुनिक मराठीतील आत्मचरित्राला साधारणत: दीड शतकाची परंपरा आहे. त्यामानाने आत्मकथनपर लेखनाचे आयुष्य कमी आहे. आत्मचरित्रे ही आयुष्याच्या मावळतीला लिहिली जातात. आत्मचरित्रात आपल्या गतजीवनातील घटनांकडे तटस्थपणे पाहण्याचा पोक्त, परिपक्व दृष्टिकोन आलेला असतो. आत्मपरीक्षणाचे आत्मदोष शोधनाचे व ते कबूल करण्याचे (धाष्ट्र्य) आत्मबल या मावळतीच्या काळात अंगिकारणे शक्य असते. ही आत्मचरित्राच्या अंतरंगाची जमेची बाजू म्हणावी लागेल. या संदर्भात श्री. के. क्षीरसागर यांच्या मते "हा प्रकार वार्धक्यातच हाताळण्याला अधिक सोयीचा आहे मात्र बरीच दुनिया पाहिल्यावर बरीच सुखदु:खे भोगल्यावर तो हाती घ्यायला हवा"[११] आत्मचरित्र लिहिण्यास भरभक्कम अनुभव यायला हवे, असे क्षीरसागरांना वाटते. जीवनाकडे तटस्थपणे पाहण्याची तयारी झाली की, आत्मचरित्र लिहावे तसे आत्मचरित्र यशस्वी होईल. येथे वयापेक्षा ताटस्थ ही वृत्ती अधिक महत्वाची आहे. आत्मकथने ही एखादा अपवाद वगळता आयुष्याच्या ऐन उमेदीत लिहिली गेली आहेत. लिहिली जात आहेत. तरुण अवस्थेत आपले जीवनानुभव सांगणे, प्रगट करणे ह्याला गतीचा संदर्भ आहे. प्रौढत्व अधिक स्थिर व संयमी असू शकेल पण तारुण्य आपल्या जीवनातील विसंवाद विषमतेचे चटके, लादलेली गुलामगिरी, अन्याय, जुलूम ह्याविरुध्द तीव्र प्रतिक्रिया तीव्रतेने व्यक्त करते. पुष्कळदा संयमापेक्षा ते

आक्रमक बनलेले असते. आक्रमकतेतून माणुसकीचा पुकार केला जातो. "मनात येतं, कुठ तरी, कुणाला तरी हे काळीज फाडून पार इस्कटून दाखवाव"[१२] यामध्ये भूतकाळातील अनुभव दुःख माणुसकीसाठी चाललेली धडपड हीच त्यामागील भावना प्रगट होते.

आत्मचरित्र केवळ इतिहासाचे चित्रण करतो तर आत्मकथनकार इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी संवाद करीत असतो. वर्तमान घटना प्रतिपादत असताना भविष्यासंबंधीचे भाकितेही त्याच्या प्रतिपादनातून प्रकट होत असतात. कारण त्याचा वर्तमान घडत असतो आणि पुढील आयुष्याचा प्रवास त्याच्या पुढ्यात (समीप) असतो. आत्मचरित्रकार एक प्रकारे स्थिर जीवनाचे चित्रण करतो. आत्मकथनकाराचे नाते घडण्याच्या अवस्थेशी गतीमानाशी असते. तो आपले जीवनानुभव कथन करीत असतो. पुढेही करणार असतो. आत्मचरित्र हे बोधासाठी तर आत्मकथन हे नवनिर्मिती, नवसंस्कृती, नवक्रांती याचे द्योतक आहे. "नव्या जाणिवा घेऊन उदयाला आलेले साहित्य नवे घाट घेऊन अवतरते तेव्हा साहित्याचे पारंपारिक निष्कर्ष अपुरे पडण्याची शक्यता असते."[१३] वासुदेव मुलाटे यांनी आत्मकथन आणि आत्मचरित्र यातील महत्वाचा फरक सांगितला आहे. कारण दलित आत्मकथनातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे रूप इतके अनन्यसाधारण आणि विलक्षण आहे की तो अर्थपूर्ण अनुभव आत्मचरित्राचा परंपरागत घाट स्वीकारुन व्यक्त होणार नाही. आत्मचरित्रकार हे एखादा अपवाद वगळता मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिनिधी आहेत. बहुतांशी आत्मकथनकार नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. वेगवेगळ्या अस्पृश्य जातीतून ते आले आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुभव कथनातील दाहकता वेगळेपण आणि जीवनाचे पदर भिन्न आहेत. 'स्त्री' आत्मकथनाच्या बाबतीत असे म्हणा येईल की, तिच्या सामाजिक, आर्थिक स्तरातून त्या लेखनाची निर्मिती झाली नाही तर 'स्त्री' म्हणून तिला जी कुटुंब व समाजाकडून वागणूक मिळाली तीच तिच्या लेखनाची प्रेरणा व पार्श्वभूमी असते. दलितांपासून ब्राह्मण समाजापर्यंत आणि विस्थापितापासून प्रस्थापितापर्यंत कोणत्याही गटातील स्त्रीने आत्मकथन लिहिले मात्र प्रमाण फार अल्प आहे. इतिहासाविषयीची दृष्टी समान आहे. आपला इतिहास हा आपल्या पूर्वजांना व आपल्याला तुडवणारा, आपले सर्वस्व हिरावून घेणारा, मनावर व शरीरावर आसूड ओढणारा म्हणूनच क्रूर व घृणास्पद आहे. ह्याची त्याला जाणीव आहे. अन्याय गुलामगिरी व दारिद्रय हे कृत्रिम रीतीने आपल्यावर

SHI... LIBRARY ... KOLHAPUR

लादले गेले होते. कधी धर्माचा आधार घेऊन तर कधी सनातनत्वाचा आधार घेऊन ह्याची त्याला कल्पना आहे. हे सारे स्मृतीरुपाने त्याच्या मनात आहेत. त्यामुळे आपल्या मनातील स्मृती तो पुसू शकत नाही. दास्याच्या इतिहासाचे गोडवे कोण गाईल? हे दु:ख ताण-तणाव स्वाभाविकपणेच त्याच्या अनुभवांचे रूप धारण करतात. हा इतिहास तो नाकरतो. ह्यासाठीच हे सांस्कृतिक दु:ख मानवी जीवनाचा अनावर उद्‌गार असल्यामुळे आत्मकथनाचे आशयद्रव्य ठरले आहे. पीडक आणि पीडित शोषक आणि शोषित ह्यांच्यातील संबंधाचा तो भेदक सत्यार्थ आहे. तेव्हा दलित आत्मकथन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भाशिवाय असूच शकत नाही. तो त्याचा अविभाज्य भाग आहे. हे निर्विवाद दारिद्र्य, भूक, अन्याय, अस्पृश्यता यातून सर्व प्रकारचे दु:ख आणि वेदना यांचे दर्शन घडविणारा साहित्य प्रकार म्हणजे ही आत्मकथने होत. आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या सर्व आत्मकथनांचा विचार केला तर असे दिसते की, तथाकथित साहित्य प्रकारांचे संकेत, आकृतिबंध झुगारून देऊन हे त्यांचे लेखन झालेले आहे. दलितआत्मकथने ही रुढ अर्थाने आत्मचरित्रे नाहीत. या संदर्भात प्रकाश मेदककर यांचे मत योग्य वाटते. ''दलित लेखकांनी आपल्या आत्मकथनांची जी मनोगते जोडली आहेत त्यावरुन त्यांची भूमिका आत्मचरित्र लिहिण्याची नसून जे जे भोगावे लागले, जगताना जे अनुभव आले ते प्रामाणिकपणे, प्रांजळपणे मांडण्याची दिसून येते.''[१४] दलित आत्मकथनात आक्रमकता व विद्रोह स्वाभाविकतेने आल्यामुळे ही आत्मकथने प्रसिध्दीच्या प्रारंभी खूपच खळबळ उघडून देणारी ठरली.

आत्मचरित्रातील लेखनात त्याचे स्वत:चे स्थान एखाद्या नायकासारखे असते. विशेषत: यशस्वी नायकासारखे असते. कारण आयुष्याच्या उत्तरार्धात काही नवे घेण्याची किंवा देण्याची क्षमता संपल्यावर ते बहुधा लिहिलेले असते आणि त्यात आत्मगौरवाचा भाग वैपुल्याने असतो. आत्मकथन हे व्यक्तिमनाचे असले तरी त्यातून समाजमनाचेही दर्शन घडते. त्या व्यक्तिबरोबरच जणू समाजच बोलत आहे असे लक्षात येते. मग 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' मधील माधव असो की 'उपरा' मधील लक्ष्मण असो की, 'मिटलेली कवाडे' मधील मुक्ता असो 'जिणं आमुचं' तील बेबी ते एकटेच अभिव्यक्त होत नाहीत. तर संपूर्ण समाजाची सुख दु:खे आशा-आकांक्षा, ताण तणाव यांचे विराट रूपच त्यातून व्यक्त होते. भारतीय समाज व्यवस्थेच्या तळाशी खदखदणारा जातीभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढी ग्रस्तता, श्रेष्ठ-कनिष्ठता या

प्रश्नांनी बधिर झालेल्या प्रचंड समूहाचे प्रत्ययकारी दर्शन घडते. आत्मकथन काळात लेखक व्यक्तीचे वयवृत्ती आणि सामाजिक, राजकीय, कौटुंबिक स्थितीगती यांचा परिपाक म्हणून आत्मप्रकटीकरण करताना त्यात आक्रस्ताळेपणा, शब्दबंबाळ लेखन उरबडवेपणा किंवा प्रतिशोधाचा शब्दस्फोट होण्याची शक्यता असून आत्मचिंतन, परीक्षण तटस्थता, अलिप्ततावाद, वैचारिक समतोलाची बाजू कमी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आत्मकथनातील समूह दर्शनाविषयी शंकरराव खरात म्हणतात की, ''वास्तविक ही माझ्या जीवनाची कथा आहे. पण त्याबरोबरच ही एक स्टोरी ऑफ दि अनटचेबल आहे. माझ्याबरोबर माझ्या समाजाचीही कथा आहे. एका व्यक्तीच्या एका समाजाचा गावच्या मानसिक, वैचारिक व सामाजिक जीवनात घडत आलेल्या चाललेल्या विकासाची ही कथा आहे''[१५] हे खरातांचे मनोगत ह्या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे. तेव्हा आत्मकथन हे व्यक्तिमनाबरोबरच समूह मनाचा जिवंत व ज्वलंत अनुभवाविष्कार होय. असे म्हटले तर ते उचित ठरेल. या संदर्भात हेही स्पष्ट व्हावे की, लेखक केवळ आपल्या व आपल्याच समाजाच्या भावभावना, वेदनाविकार किंवा इतर आपल्या छळाला आपला समाजही कसा अनेकदा कारणीभूत होतो त्याचे अगदी स्वच्छ चित्रणही तो करतो. त्यात एक प्रकारचे आत्मपरीक्षणच असते. आपल्या समाजाची परखडपणे मांडलेली व्यंगे, अवगुण दिसतात. अर्थात त्याठिकाणी व्यंगप्रदर्शन हा गौरवाचा किंवा धिटाई प्रदर्शनाचा भाग म्हणून येत नाही तर एक एका वास्तवाचे दर्शन घडविण्याचा तो एक प्रकार असतो. हेतू असतो. सत्य दर्शनाचे भेदक चित्र मराठी आत्मचरित्रात अभावानेच आढळते. आत्मचरित्रात आपले लाजिरवाणे अनुभव सांगण्याचे अनेक लेखक टाळतात. 'सांगत्ये ऐका' सारखा एखादाचा अपवाद. जीवनातील कटु सत्ये झाकून ठेवण्याच्या प्रयत्नामुळेच आत्मप्रतिष्ठा तेजस्वी होते असे म्हणणे भ्रामकपणाचे आहे. तेव्हा आत्मकथनात येणारे आत्मपरीक्षण म्हणजे सामाजिक वास्तवाचा आरसाच. अर्थात रुचिपालट किंवा खमंग लेखन वाचकांच्या पुढ्यात ठेवण्यासाठी केलेला हेतुतः प्रयत्न वाङ्.मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने हिणकस ठरावा ह्यात शंकाच नाही. आत्मकथनाच्या माध्यमातून स्टंट म्हणून किंवा गंमत म्हणून किंवा लहर म्हणून लेखकाने समाजाची फसगत करणे म्हणजे समाजाची क्रूर चेष्टा असून तो अक्षम्य सामाजिक अपराधच समजावा. उदा. 'मला उध्वस्त व्हायचंय' मलिका अमरेशेख आत्मकथन या प्रकारचे आहे.

आत्मचरित्र आणि आत्मकथन यातील साम्य म्हणजे दोन्हींचा लेखक आणि विषय एकच असतो. परंतु आत्मचरित्रातून परिपूर्ण जीवनाचे दर्शन घडते तर आत्मकथनातून जीवनातील पूर्वार्धाचे दर्शन घडते. त्यामुळे उत्तरार्धात 'मी' च्या जीवनात काय झाले, त्याला तो पुढे कसा सामोरा गेला, त्याचे यशापयश कोणत्या स्वरुपाचे होते, त्यातून ती व्यक्ती केव्हा, कुठे कशी स्थिर झाली? तिच्या या स्वभावाचे व्यक्तिमत्वाचे परिणाम तिच्या घरच्या माणसांवर, पत्नीवर, मुलांवर, कसकसे झाले? आक्रमण भूमिकेतून निर्माण झालेल्या सामाजिक परिणामांना नंतर त्याने कसे तोंड दिले? त्याच्या भूमिकेत परिवर्तन झाले की नाही? परिवर्तन झाले असेल तर का झाले? जीवनातील कोणती मानवी मूल्य स्वीकारून ही व्यक्ती समाजात पुढे स्थिर झाली यासारख्या प्रश्नांची उत्तरे आत्मकथनातून मिळत नाहीत. पूर्वाध हा नाट्यपूर्ण घटना घडामोडींनी संघर्षांनी थरारक अनुभवांनी भरलेला असतो म्हणून त्यांना वास्तववादी आत्मकहाणी म्हटले तर अनुचित ठरणार नाही.

## मराठीतील आत्मचरित्राचा प्रारंभ:

आत्मचरित्र संबंधी प्राचीन मराठीत ग्रंथ स्वरूपात माहिती मिळत नाही. नामदेव तुकारामांदि संतांनी आपल्या काव्यात प्रसंगानुरूप स्वतःच्या जीवनासंबंधी त्रोटक स्वरुपाचे उल्लेख आढळतात. नामदेवाच्या अभंगांत त्यांचे आत्मचरित्र रेखाटलेले आढळते. परंतु नामदेवांनी आपले आत्मचरित्र हेतुपुरस्कर लिहिलेले नाही. त्यामुळे त्यांच्या अभंगात ते अनुक्रमाने आलेलेही नाही. आपल्यालाच शोधून त्याची व्यवस्थित मांडणी करावी लागते. आपला जन्म, कूळ, व्यवसाय, विठ्ठलभक्ती, विठ्ठलप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न त्यासाठी घरातून होणारा विरोध, विठ्ठल प्राप्तीचा आनंद वगैरे जीवनव्यापी उल्लेख त्यांच्या अभंगात सापडतात.

## नामदेवाच्या अभंगात चित्रित झालेले नामदेवाचे आत्मचरित्र

"शिपियाचे कुळी जन्म झाला।"[१६]

असे आपले 'कुळ शिंप्याचे असल्याचे नामदेव सांगतात. आजोबांचे नांव 'गोमा' व आजीचे नांव 'उमा' असून आई 'गोणाई' व वडील 'दामाशेट' असल्याची माहिती अभंगातून पुरवतात. बाबाजी ब्राह्मणाने केलेली जन्मपत्रिका व तिच्यावरुन वर्तविलेले भविष्यही त्यांनी स्पष्ट केले आहे.

"अधिक ब्याण्णव गणित अकराशते। उगवता आदित्य रोहिणीसी।

शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार। प्रभव संवत्सर शालीवाहन शके।

प्रसवली माता मज मळमूत्रीं। तेव्हा जिव्हेवरी लिहिलें देवें।

शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा। नाम मंत्र खुणा वाचुनीं पाहे ॥

ऐंशी वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण। नामसंकीर्तन नायमा वृध्दि।"[१७]

आपल्या जन्माची तिथी, वार, वर्ष यासह नोंद, नामदेवाने केली आहे. ऐंशी वर्षाचे आयुष्य वाट्याला आलेले असून स्वतःच्या अवतारकार्याचा उल्लेखही त्यात येतो. विठ्ठल प्राप्ती हे नामदेवांचे जीवन-ध्येय आहे. ध्येयप्राप्तीसाठी आटोकाट प्रयत्न केला जातो. प्रदीर्घ परिभ्रम, तपश्चर्येनंतर झालेल्या आपल्या विठ्ठलमय अवस्थेचे वर्णन ते करतात-

"नामा तो केशव केशव तो नामा। अभिन्नत्व आम्हां केशवासी।[१८]

"तहानभूक काही आथींचना मनी। विठ्ठल विठ्ठल म्हणोनि हाचि छंद।"

"नामा म्हणें मज आदि अंतु एकु। जननी आणि जनकु पांडुरंग।[१९]

विठ्ठलाच्या संदर्भातील आपले विविध भाव निष्ठा नामदेवांनी प्रकट केली आहे. विठ्ठलाच्या नादी लागल्याने घरातील लोकांनी केलेली कानउघाडणी कुठल्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता नामदेवांनी स्पष्ट केली आहे.

"सुहदे, सोयरी सकळिकें मिळोनि। करिती झाडणी नानापरी।"[२०]

असे नामदेव सांगतात. नामदेवांचे वडील स्वतःची नाराजी

"गणगोतांमाजी बरे केले नांव। माझे सत्व सर्व बुडविले।"[२१]

"अरे ऐसे तुवां बुडविले कुळ। सांडिली सकल लोकलाजा।"[२२]

नामदेवांना 'कुळबुडव्या' म्हणून व्यक्त करतात नामदेवांची आई गोणाई देखील त्यांची कान उघाडणी करते.

"सुदैवाची लेकरे वर्ततातितेः कैसी। तू मज आलासि कुळक्षय।"[२३]

"सांडी सांडी नाम्या तू हे देवपिसे। बळे घर कैसे बुडवितोसी।"[२४]

"नको संग धरू नामा ऐक गोष्टी। गोणाई हनुवटी धरुनी सांगे।"[२५]

अगोदर नामदेवांना चार शिव्या देऊन नंतर मातेच्या ममतेने गोणाई आपल्या मुलाची समजूत घालते. मुलाचे भले व्हावे म्हणून तळमळणारी आई नामदेवांनी याठिकाणी उभी केली आहे. कोणी काहीही म्हटले तरी नामदेव आपला विठ्ठल ध्यास सोडायला तयार नाहीत. ते आईला उत्तर देतात-

"एक पांडुरंग दुजा नाही चांग। म्हणुनी त्याचा संग धरिला मातें।

माझी तुज काही करणे न लगे चिंता। मज आहे पोशितां पांडुरंग।"

मित्र बंधू सज्जन सोयरा। माझिया संसारा हाचि एक।"[२६]

पांडुरंगच सर्वस्व असून त्याच्या खांद्यावर आपला जीवनभार टाकून निश्चित विसावणारे नामदेव यातून उभे राहतात.

नामदेवांची पत्नी राजाई हिने सुध्दा नामदेवांचे विठ्ठलवेड पाहून त्यांची खरडपट्टी काढलेली दिसते. पती हेच जीवनातील सर्वस्व असल्याने आणि आधारास्तव दुसऱ्याकडे पाहण्याची सोय नसल्याने तिचे संतापणे स्वाभाविक वाटते.

"लावोनी लंगोटी झालेती गोसावी। आमुची ठेवाठेवी कोण करी।

तुमचिये गती लेंकरे नेणती। कोण चालविती घराचार।

म्हणोनी माझे चित्त आपुलेनी उद्वेगे। कवणे जीवाचे सांगे सुख दु:ख।"[२७]

आपल्या धर्मपत्नीची चीड नामदेवांनी अशी रेखाटलेली आहे. स्वत:चे दोषही नामदेवांनी मनमोकळेपणाने सांगितलेले दिसतात. वर्ग परिहार, गुरु शिवाय असलेली ज्ञानाची व्यर्थता त्यांनी स्पष्ट केली आहे.

"कुलालाचे कुंभ भाजल्यावीण माती। काय साहे संगति पाणियाची।

मेणाची पुतळी घेता करी बरी। अग्नीचे शेजारी राहे कैशी॥"[२८]

असे वाङ्.मयीन दाखले देऊन आपली गुरुविण अवस्था स्पष्ट केली आहे. विसोबा खेचर यांच्यासंबंधी ते म्हणतात-

"डोळियाचे डोळे उघडिले जेणे। आनंदाचे लेणे लेवविले।"[२९]

पुढे सर्वच विठ्ठलमय झाल्यावर नामदेव आनंदाने बोलू लागतात.

''नाचू किर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावूं जगी।''[३०]

विठ्ठल प्राप्तीनंतर आईला झालेल्या आनंदाची माहिती अभंगातून सांगतात.

''गोणाई म्हणे नामा। भली केलीरे बा सीमा।''[३१]

आईने नामदेवांना दिलेली ही शाबासकी कौतुक आहे.

अशा प्रकारे आपल्या जीवनातील सर्व महत्वाची वळणे सांगून नामदेवाने मराठी साहित्यात नकळतपणे अद्य पद्य आत्मचरित्रकाराचे स्थान मिळविलेले आहे. ''नामदेव उत्कट पण निर्भीड आत्मचरित्रकार ।।''[३२] असल्याचे द.के. केळकर कौतुकाने सांगतात तर अ.ना. देशपांडे म्हणतात, ''नामदेवांचे आत्मचरित्र हे पहिले आत्मचरित्र ।।''[३३] एक दीन, दरिद्री, सांसारिक मनुष्य प्रपंचातून परमार्थात जेव्हा उडी घेतो तेव्हा त्याच्या मानसिक जीवनात परिवर्तन होत जाते. त्याला देह घर संसाराचा कंटाळा कसा येऊ लागतो आणि शेवटी बंध मोक्षाची काळजी संपून त्याला कैवल्याचा साक्षात्कार कसा होतो याचे जिवंत प्रत्ययकारी निवेदन करणारी मराठीतील ही पहिली आत्मकथा आहे. ''महाराष्ट्र शारदेला एका भक्तश्रेष्ठाने अर्पण केलेला हा आत्मचरित्राचा पहिला अमर नजराणा आहे''[३४] अ.ना. देशपांडे यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. कोणतेही साहित्याचे अभ्यासाचे नियम, अटी किंवा हेतू यांचा स्पर्श न होताही लिहिल्या अभंगावरून एक आत्मचरित्रपर लेखन करणारे व्यक्तिमत्व म्हणता येईल.

नामदेवानी आत्मचरित्रात्मक लेखनाचा जो पायंडा किंवा पाया घातला त्याचा विकास तुकारामाच्या अभंगरचनेतून दिसून येतो.

**तुकारामाच्या अभंगातील तुकारामचे आत्मचरित्र:**

''याती शुद्र वैश्य केला वेंवसाव। आदि तों हा देंव कूळपूज्य।

संसारे झालो अति दु:खी। मायबाप सेखी क्रमलिया।

दुष्काळें आटिलें द्रव्ये नेला मान। स्त्री एकीं अन्न अन्न करता मेली।

लज्जा वाटे जीवा त्रासलों या दु:खे। वेंवसाव देंता तुटी येत।

आरंभी कीर्तन करी एकादशीं। नव्हतें अभ्यासी चित्त आधी।

काही पाठ केली संतांची उत्तरे । विश्वासे आदरे करोनिया ।

संतांचे सेविले तीर्थ पायावणी । लाज नाही मनी येऊ दिली।

टाकला तो काही केला उपकार । केले हें शरीर कष्ट वुनी ।

वचन मानिले नाही सहृदांचे । समूळ प्रपंचे वीट आला ।

सत्यासत्यासी मन केले ग्वाहीं । मानिले नाहीं बहुमता ।

मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढमनी ।

यावरी जाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरिलें चित्ती विठोंबाचे ।

निषेधाचा काही पडिला आघात । तेणे माझे चित्त दुखविलें ।

बुडविल्या वह्या बैसलो धरणे । केले नारायणे सावधान ।

तुकाराम म्हणे माझे सर्व भांडवल । बोलविलें बोल पांडुरंगे ।''[३५]

या अभंगातून तुकारामचे कुळ, व्यवसाय, दुष्काळ, धंद्यात झालेले नुकसान, पहिल्या पत्नीचा अन्नान्न करीत झालेला मृत्यू, संसारातील ही नानाविध दुःखे वाट्याला आल्याने पांडुरंगाकडे घेतलेली धाव-पण तिकडे आपले लक्ष लागत नसल्याची दिलेली प्रांजळ कबुली, संतांचे केलेले अनुकरण, स्वप्नातील गुरुचा उपदेश, स्वीकारलेली विठ्ठलशरणता, इंद्रायणीत बुडविलेल्या वह्या व पांडुरंगाने घातलेली समजूत. आयुष्यातील जवळजवळ सर्व प्रमुख टप्प्यांचे किंवा घटनांचे उल्लेख या अभंगात ग्रंथित केले आहेत. साध्या सरळ शब्दात तुकारामाने उभे केलेले हे जवळजवळ पूर्ण जीवनचित्र कौतुकास्पद वाटते. तुकारामाच्या अभंगातील पुढील उल्लेखावरून त्यांचे संपूर्ण आत्मचरित्र येते असे म्हणावयास हरकत नाही. आपल्या जीवनात विठ्ठलच सर्वस्व असल्याचे तुकाराम सांगतात-

''पतिव्रता नेणे अणिकांची स्तुती । सर्व भावे पति ध्यानी मनी ।

तैसे माझे मन एकविध जाले । नावडे विठ्ठलविण दुजे ॥[३६]

तुकारामाचे जीवनच विठ्ठलमय होऊन जाते ध्यानी मनी

स्वप्नी विठ्ठल आपला सांगाती आहे असे त्यांना वाटते -

''जेथे जातो तेथे तू माजा सांगानी । चालविसी हाती धरोनिया ।''[३७]

''आम्ही जातों आपुल्या गांवा। आमुचा रामराम घ्यावा।

अंत: काळी विठों आम्हासी पावला। कुढी सहित झाला तुका गुप्त।''[३८]

असे तुकाराम म्हणतात. विठ्ठल प्राप्ती हेच तुकारामाचे ध्येय आहे आणि त्याने ते मिळविलेले आहे. त्यातच त्याला आपल्या जीवनाची कृतकृत्यता वाटते. तुकारामाची व्यक्तिरेखा सर्व पैलूंसह त्यांच्या आत्मचरित्रात चित्रित झालेली आहे.

## जनाबाईच्या अभंगातील संशोधित आत्मचरित्र:

जनाबाई ही शुद्र व पोरकी अशी नामेदवांची दासी. 'विठ्ठल' हेच तिच्या जीवनातील सर्वस्व आहे. केवळ नामदेवांमुळे विठोबाशी आपली मैत्री झाली या जाणिवेने नामदेवाचे ऋण ती कृतज्ञतेने मान्य करते-

'जनी म्हणे जोड झाली विठोबांची। दासी नामयाची म्हणोनिया।'[३९]

धन्य मायबाप नामदेव माझा। तेणे पंढरीराजा दाखविले।'[४०]

अभंगाच्या शेवटी येणाऱ्या 'नामयाची जनी' या शब्दांमधून तिची कृतज्ञताच व्यक्त होताना दिसते.

''माय मेली बाप मेला। आतां सांभाळी विठ्ठला।

मी तुझे गा लेंकरु। नको मजसी अव्हेरु।''[४१]

या शब्दांतून आपली अनाथ पोरकी कहाणी ती विठोबाला ऐकवते नि आपले अनाथ दु:ख बोलके करते-

''मायबाप बंधुबहिणी। तुं बा सखा चक्रपाणी।''[४२]

अशी सर्वच नाती तिला विठ्ठलाच्या ठिकाणी जाणवतात. विठ्ठल हेच तिला आपले 'माहेर' वाटते. माहेरच्या मोकळेपणाने ती विठ्ठलाशी वागते. ''तुज वाचोनि मजला। कोणी नाही रे विठ्ठला।'' असे त्याला कळवळून सांगते. विठ्ठल आपल्याला दळू लागतो पाणी भरु लागतो शेणी लावू लागतो झाडलोट करु लागतो अशी तिची समज आहे. विठ्ठल पोटच्या मायेने सांभाळतो या जाणिवेने भारावून येऊन ती त्याचा 'विठाई' असा उल्लेख करते. अति जवळिकीमुळे ती विठ्ठलला शिव्या देखील घालते.

''अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।

तुझी रांड रडकी झाली । जन्मसावित्री चुडाल्याली ।

तुझे गेले मढें । तुला पाहून काळ रडे ।''[४३]

तसेच विठ्ठलाने केलेले उपकार नम्रतेने मान्य करते.

''माझे मनी जे जे होते । ते ते दिधले अनंते ।

देंह देऊनी विदेही केले । शांती देऊनी मी पण नेले ।

मूळ नेलें हे क्रोधाचे । ठाणे केले विवेकाचे ।

निजपदी दिधला ठाव । जनी म्हणजे दाता देव ।।''[४४]

'देह जाउनी विदेही होणे' हीच जनाबाईच्या जीवनाची इतिकर्तव्यता होय. अभंगात आलेली आई-वडिलांची ओळख नामदेवांकडे येणे, नामदेवाच्या कृपेमुळे झालेली विठ्ठल प्राप्ती, माय, बाप,बंधू भगिनी ही विठोबाशी जडलेली विविध नाती विठ्ठलाच्या संगतीमुळे शेवटी मिळालेला मोक्ष या जनाबाईच्या जीवनातील मुख्य घटना अभंगामध्ये चित्रित झालेल्या दिसतात. विठ्ठल हेच जनाबाईच्या जीवनातील सर्वस्व असल्याने तिच्या जीवन कहाणीत विठ्ठलाला केंद्रस्थान मिळणे अपरिहार्यच आहे. विठ्ठलाच्या भोवती विणलेले तिचे हे विश्व हेच तिचे आत्मचरित्र ठरते.

**बहिणाबाईच्या अभंगात चित्रित झालेले बहिणाबाई चे आत्मचरित्र:**

वेरुळच्या पश्चिमेस असलेले देवगाव या गावी श्री आऊजी कुलकर्णी यांच्या कुळात त्यांचा जन्म झाला. पित्याचे नांव आउदेव व आईचे नांव जानकी. आरंभी बरीच वर्षे त्यांना काही संतती नव्हती म्हणून त्यांनी लक्ष तीर्थावर नित्य स्नान करून शिवाचे अनुष्ठान करण्याचा क्रम सुरु केला. नंतर त्यांना 'होईल संतान कन्या दोन पुत्र' असा दृष्टांत झाला. त्यापुढे एका वर्षाने बहिणाबाईचा जन्म झाला. वीरेश्वर नावाच्या ब्राह्मणाने पत्रिका करून भविष्य वर्तविल्याचे बहिणाबाई सांगतात-

''देवलासी काही होईल भाग्याची । आयुष्याची बळ फार आहे ।''[४५]

शिऊर येथील तीस वर्षे वयाच्या रत्नाकर पाठकाशी पाच वर्षे वयाच्या बहिणाबाईचे लग्न होते. त्यांचा चांगलपणा वडिलांच्या संकटकाळात त्यांनी केलेल्या मदतीवरून दिसून येतो. वडिलांच्या बिकट परिस्थितीत ते जावयाला निरोप पाठवितात.

''गोत्राची फेडा बाकी साकी रीण । मागती लिहून शेतमळा ।''

तू सखा सोयरा जावई मित्र तू । आमुचा हा अंतु पाहू नको ॥''[४६]

हा निरोप मिळताच माझे भ्रतार देवगावी आले व मध्यरात्री घर व गांव सोडून आम्ही सर्व मंडळी गोदातीरी आलो असे बहिणाबाई कौतुकाने सांगतात. अकरा वर्षे वयाच्या बहिणाबाई संतांच्या संगतीत राहतात. त्याचवेळी कोल्हापूरला आल्यावर बहिरभटाने दिलेल्या गाईची हे कुटुंब मनोभावे सेवा करते.

''दळिता कांडिता वाहताही पाणी । वत्सेंवीण जनी नावडें हो ।''[४७]

हे वासरु बहिणाबाईबरोबर कीर्तन ऐकायले जाते. आरती झाल्यावर ते माणसाप्रमाणे नमस्कार करीत असल्याचे बहिणाबाई उल्लेखितात. काही कालावधीनंतर वासरु मरते तेव्हा 'प्राणासवे प्राण जाऊ पाहे माझा' अशी बहिणाबाईंची शोकाकुल अवस्था होते.

जयरामस्वामींच्या कीर्तनात तुकारामांचे गुणगान ऐकुण बहिणाबाईंचा अंत:करणावर त्यांचा ठसा उमटतो.

''तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ।

बहिणी म्हणजे तुका सदगुरु सहोदर । भेटता अपार सुख आहे ।''[४८]

अशी तुकारामाच्या भेटीची ओढ, तहान त्यांना लागते. भेट होत नाही म्हणून स्वत:ला दोष देतात मात्र काही कालावधीनंतर झालेल्या तुकारामाच्या भेटीचे वर्णन बहिणाबाईने विस्ताराने केले आहे.

'तुकाराम रुपे घेऊन प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळिजे ।

नको करु चिंता आहे मी । तुजपाशी घेई अमृतासी हातीचिया ॥

ठेऊनियां कर मस्तकी बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्री ।

म्यांही पायावरी ठेविले मस्तक । दिधले पुस्तक मंत्रगीता ।

कार्तिकात वद्य पंचमी रविवार । स्वामीचा विचार गुरुकृपा ।

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

आनंदले मन चिद्रूप कोंदले । उठोनि बैसले चमत्कारे ।

मंत्र आठवती तुकोबा स्वरूपे । स्वप्नमाजी कृपा पूर्ण केली ॥'[४९]

या तुकाराम दर्शनाने व दीक्षेने बहिणाबाईंचे मन आनंदून जाते. तुकारामाविषयी आपले भाव व्यक्त करतात.

''पांडुरंग तुका पांडुरंग तुका । वेगळीक देखा केवि होय ।''[५०]

बहिणाबाईची अशी अवस्था पाहून तुकोबाच्या चरणी लागलेली पाहून मत्सराने पती त्यांना सोडून जातो याचे वर्णन करतात-

''न पाहे ती मुख सर्वथा इयेचे । हिनत्व आमुचे कोण फेडी?।''

भडिमार सोसूनि कोण राहे येथे । ऐसेया स्त्रियेते कोण पाळी ।''[५१]

नवऱ्याचे हे उद्गार त्या ऐकून त्या संतापत नाहीत तर विवंचनेत पडतात. त्यांचे भारतीय संस्कृतीचे स्मरण करुन पतीची सेवा करणे हाच आपला परमधर्म आहे असे त्या म्हणतात. पती हेच सर्वस्व असल्याची जाणीव अभंगात उमटते.

''भ्रताराची सेवा तोची आम्हां देव । भ्रतार स्वयमेव परब्रह्म ।

भ्रतारवचनासी उल्लघींन जरी । पापें माझ्या शिरी पृथिवीची ।

भ्रतारसेवने सांग हा परमार्थ । भ्रतारेचि स्वार्थ सर्व आहे?

सदगुरु भ्रतार साधन भ्रतार । हा सत्य निर्धार अंतरीचा ॥[५२]

पुढे त्या म्हणतात-

''प्राणेविण देह काय पावे शोभा । रात्रीवीण प्रभा चंद्रचिये ।''[५३]

भ्रताराची सेवा पतीव्रता करी । तरी ते उध्दरे अक्षयकुळे ।''[५४]

अशी त्यांची नितांत श्रध्दा आहे. बहिणाबाईच्या या वागणुकीने त्यांच्या पतीला स्वत:च्या अविवेकी वागणुकीचा पश्चाताप होतो. सर्व विसरून तेही तुकारामाच्या चरणी लीन होतात. बहिणाबाईच्या पतीमध्ये घडलेल्या परिवर्तना संदर्भात ल.रा. पांगारकर म्हणतात, ''सुशील व प्रेमी बायको नवऱ्याचे स्वभावदोष मनात न आणता त्याला कशी ताळ्यावर आणते याचे बहिणाबाई हे एक उत्कृष्ट

उदाहरण आहे''[५५] पांगारकराचे मत अगदीच समर्पक वाटते. मन हे शंकाचे आश्रयस्थान असते. संयम सोडून शंकांना आश्रय दिला तर त्याना विदारक स्वरुप येते. त्यातून उध्वस्तत: येते. बहिणाबाई संयमी आहेत त्यामुळेच त्यांनी ते आघात संयमाने सहन केले अन्यथा त्याला विदारक रूप प्राप्त झाले असते.

असे बहिणाबाईनी जीवनातील छोटे मोठे प्रसंग दिले आहेत त्यातून त्यांची ठळक प्रतिमा व्यक्त होते. स्त्री जीवनाच्या स्वाभाविक मर्यादांना बहिणाबाईने परमेश्वर प्राप्तीपेक्षा अधिक महत्व दिले आहे. सांसारिक जीवनाचा अधिक्षेप न करता मिळवलेली मुक्ती यात बहिणाबाईचे वेगळेपण जाणवते.

नामदेव तुकाराम, जनाबाई व बहिणाबाई या संतांच्या अभंगात आत्मचरित्र प्रकटलेले दिसत असले तरी त्या काळात या वाङ्मय प्रकाराचा विकास आपल्याकडे झालेला आढळत नाही. स्वत:विषयी काही गौरवपर सांगू नये हे भारतीय संस्कृतीने पाजलेले बाळकडूच याला प्रामुख्याने कारणीभूत असावे. भारतीय संस्कृतीत व्यक्तिजीवनाला बरेचसे गौण स्थान मिळाले असल्याने व्यक्तीच्या मनमोकळ्या आविष्कारापेक्षा त्याचा संकोचच विशेष शिष्टमान्य समजला जातो. ज्ञानेश्वरीत

'' परी प्रौढी न बोलें हो जी । तुम्ही सर्वज्ञाचा समझी ।''

''द्यावे अवधान हे माझी । विनवणी सलगीची ।।''[५६]

या ज्ञानेश्वरांच्या ओवीतून येतो. मुक्तविचार विनिमयापेक्षा मुकाट्याने केलेले आज्ञापालन आणि वैचित्र्यापेक्षा साचेबंदपणा हेच या संस्कृतीचे ठळक आणि महत्वाचे अंग. अशा स्थितीत प्राचीन काळात आत्मचरित्रासारखा व्यक्तिनिष्ठ लेखन-प्रकार आपल्याकडे रुजलेला नसावा हे स्वाभाविकच आहे. शिवाय प्राचीन कालातील साहित्यिक वर्ग सर्वस्वी ईश्वर भक्तीत आणि परमार्थ चिंतनात रममाण झाल्याने त्यास आत्मचरित्र लिहून स्वत:च्या गुणांचे किंवा कृत्यांचे जनतेसमोर प्रकटीकरण करणे अप्रयोजक वाटले असावे. परंपरेने चालत आलेल्या किंवा लादल्या गेलेल्या या संकोचामुळे हे आत्मचरित्रापासून अलिप्त राहिले असावेत.

नाना फडणवीसांचे पेशवाईच्या कालातील आत्मचरित्र प्रसिध्द आहे. तेही त्रोटक व विशिष्ट प्रसंगापरते मर्यादीत आहे. पेशवाईच्या अखेरच्या कालखंडात बडोद्याचे सुप्रसिध्द गंगाधर शास्त्री पटवर्धन

यांनीही त्रोटक आत्मचरित्र लिहिले आहे. पण यांना पूर्णांशाने आत्मचरित्र म्हणता येणार नाही. एखाद्या घटनेविषयी जीवनातील कटू प्रसंगांच्या वेळी उत्कट भावना मनात येऊन ती व्यक्त केली गेली आहेत.

इंग्रजी कालखंडात ग्रंथकार विष्णुबवा ब्रह्मचारी यांनी आपल्या 'वेदोक्तधर्म प्रकाश' (१८५९) या ग्रंथात आत्मनिवेदनपर मजकूर लिहिला आहे. क्रांतिवीर वासुदेव बळवंत यांनी १८७९ मध्ये असाच त्रोटक आत्मचरित्रपर मजकूर लिहिला आहे. पण त्यासही आत्मचरित्र म्हणता येणार नाही. प्राचीन साहित्यातील आलेले त्रोटक आत्मनिवेदन म्हणजे आत्मचरित्राची बाल्यावस्था म्हणता येईल.

ग्रंथ स्वरूपात किंवा लिखित स्वरूपातील मराठीतील पहिले आत्मचरित्र प्रसिध्द व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांचे 'आत्मचरित्र' हेच होय. या ग्रंथाचा निश्चित लेखनकाळ सांगणे कठीण आहे (१८६८ ते १८७१) हे आत्मचरित्र साध्या व घरगती भाषा पध्दतीने नटलेले आत्मगौरवाच्या प्रवत्तीपासन सर्वस्वी आलिप्त असे मनमोकळे आत्मनिवेदन आहे. अव्वल इंग्रजीतील महाराष्ट्रीय समाज नुकत्याच रूज लागलेल्या समाजसुधारणांच्या कल्पनांना साकार स्वरूप देण्याचे काही सुधारणावादी लोकांचे प्रयत्न. त्या काळची शिक्षणाची व्यवस्था इत्यादीविषयी सामान्य मनुष्यास उपलब्ध नसलेली माहिती या ग्रंथात मिळते. 'अव्वल इंग्रजी काळतील महाराष्ट्रीय समाज' यादृष्टीने हे आत्मचरित्र उल्लेखनिय वाटते.

दादोबांचे समकालीन बाबा पदमनजी यांनी लिहिलेले 'अरुणोदय' १८८७ साली लिहिले. या आत्मचरित्रात धर्मांतराची हकीकत सांगितली आहे. ती सांगत असताना हिंदधर्मातील गणावगण धार्मिक व सामाजिक समजुती रुढी यांचे विवेचन केले आहे. या लेखनावरून आत्मचरित्र लिहिण्यास आवश्यक असणारी साधनसामुग्री व तिचे महत्व यांची त्या काळातही लेखकास चांगली जाणीव होते असे दिसते. पत्रे, स्मरण वही, दैनंदिनी, वर्तमानपत्रातील उतारे इत्यादी साधनांचा पध्दतशीर उपयोग केल्याचे लेखकाने नमूद करुन ठेवले आहे. बोधवादी दृष्टिकोनातून व सत्याला न डावलता लिहिलेले दिसते. बहुतेक आत्मचरित्रे प्रांजळ व वास्तवदर्शी आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या आत्मचरित्रपर ग्रंथाची संख्या अत्यल्प असली तरी विसाव्या शतकाच्या प्रथमार्धात आत्मचरित्र लिहिण्याची प्रवत्ती वाढत्या प्रमाणात निर्माण

झालेली आढळते. अलीकडच्या काळात बोधवादी दृष्टिकोनातून सांगण्याची पध्दत बदललेली दिसते. बऱ्याच आत्मचरित्रांत आत्मशोध घेण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

या आढाव्यावरून आत्मचरित्र या वाङ्‌मय प्रकाराची परंपरा नामदेवांपासून तो सद्यःकाळापर्यंत अशा प्रकारे सांगता येते.

**संदर्भसूची:**


१. आत्मचरित्र मीमांसा : आनंद यादव, प्रकाशक - सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाउस, १२१६, सदाशिवपेठ, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी १९९८पृ. ६१

२. Encyclopeadia Britannica : Vol. London 1768, p. 854.

३. The Universal Dictionary of English Language : Ed. Henry Cecil Wyld, London, p. 67

४. Webster, New International Dictionary : 2nd Ed. Vol. 1, New York, 1960, p. 140

५. Art of Autobiography : Pune, 1962 D.G. Naik, p. 44.

६. चरित्र आणि आत्मचरित्र : लेखक: सदा कऱ्हाडे, मुंबई प्र.आ. १९७६, पृ. १०१.

७. आत्मचरित्रमीमांसा : लेखक- आनंद यादव, पृ. ६.

८. तत्रैव : पृ. २

९. चरित्र-आत्मचरित्र : लेखक- अ.म. जोशी, प्रकाशक आणि मुद्रक - श्री. एल.व्ही. तावरे, स्नेहवर्धन, ८६३, सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे, पुणे, व्दितीय आवृत्ती- एप्रिल १९६५, पृ. १०८

१०. तत्रैव : पृ. १०९

११. तसबीर आणि तकदीर : लेखक - श्री. के. क्षीरसागर, मुंबई - १९७६, पृ. १३

१२. काट्यावरची पोटं : लेखक - उत्तम बंडु तुपे, मनोगत

१३. दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरुप, लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे प्रकाशिका - सौ. उषा मुलाटे, स्वरुप प्रकाशन, 'अक्षर' ८५८ सह्याद्रीनगर, एन-५, (दक्षिण) सिडको, औरंगाबाद, प्र.आ. जानेवारी १९९९ पृ. २२

१४. तत्रैव : पृ. २४

१५. तराळ-अंतराळ : लेखक - शंकरराव खरात, प्रास्ताविक

१६. श्रीसकल संतगाथा : अभंग क्र.१२४४१, संपादक - का.अ. जोशी, आवृत्ती व्दितीय, पुणे १९६७, पृष्ठ २०९.

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | तत्रैव | : | अ.क्र. १२५४. प. २११ |
| १८. | तत्रैव | : | अ.क्र. १२५२.२. प. २११ |
| १९. | तत्रैव | : | अ.क्र. १२६४.३. प. २१२ |
| २०. | तत्रैव | : | अ.क्र. १२६४.१४. प. २१२ |
| २१. | तत्रैव | : | अ.क्र. १३०८.२. प. २२२ |
| २२. | तत्रैव | : | अ.क्र. १३०८.१०. प. २२३ |
| २३. | तत्रैव | : | अ.क्र. १२६६.५. प. २१३ |
| २४. | तत्रैव | : | अ.क्र. १२९८.५. प. २२१ |
| २५. | तत्रैव | : | अ.क्र. १२७०.५. प. २१४ |
| २६. | तत्रैव | : | अ.क्र. १२७२.२३. प. २१४ |
| २७. | तत्रैव | : | अ.क्र. १३२०.१. प. २२४ |
| २८. | तत्रैव | : | अ.क्र. १३४६. प. २३१ |
| २९. | तत्रैव | : | अ.क्र. १४०१. प. २४० |
| ३०. | तत्रैव | : | अ.क्र. १३९२. प. २३९ |
| ३१. | तत्रैव | : | अ.क्र. १३०१. प. २२१ |
| ३२. | मराठी साहित्याचे सिंहावलोकन | : | लेखक - द.के. केळकर. प. १२१ |
| ३३. | प्राचीन मराठी वाङ.मयाचा इतिहास उत्तरार्ध | : | लेखक - अ.ना. देशपांडे. पुणे १९६९. प. १०८. |
| ३४. | तत्रैव | : | प. १०८. |
| ३५. | तुकाराम दर्शन | : | लेखक - गं.बा. सरदार. आवृत्ती पुणे १९६८. प १ व २ |
| ३६. | श्रीसकल संतगाथा भाग दुसरा | : | अभंग क्रमांक १६४१. संपादक का.अ. जोशी. आ.व्दितीय पुणे १९६९. प. ४४६ |
| ३७. | तत्रैव | : | अ.क्र.१९२६. प. १७३. |
| ३८. | तत्रैव | : | अ.क्र.१६०७ प.९. |
| ३९. | श्रीसकळ संतगाथा | : | अ.क्र. ३१. संपादक - का.अ. जोशी. आ.व्दितीय पुणे १९६७. प. ४२७ |
| ४०. | तत्रैव | : | अ.क्र. ७८ प. ४३१. |
| ४१. | तत्रैव | : | अ.क्र. ५८ प. ४३०. |
| ४२. | तत्रैव | : | अ.क्र. २०४ प. ४४३. |
| ४३. | तत्रैव | : | अ.क्र. १९. प.४२६. |
| ४४. | तत्रैव | : | अ.क्र. २०३. प.४४३. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | मराठी वाड.मयाचा इतिहास: तिसरा खंड | : | लेखक - ल.रा. पांगारकर. आ.शके १८६१. प. १२ |
| ४६. | तत्रैव. | : | प.१४. |
| ४७. | तत्रैव | : | प.१४. |
| ४८. | महाराष्ट्र संत कवयित्री | : | लेखक- ज.र. आजगावकर. आवत्ती - १९३९. प. १०८. |
| ४९. | श्रीसकल संतगाथा खंड दसरा | : | अ.क्र.६. संपादक - का.अ. जोशी. आवृत्ती व्दितीय १९६७. प. ४०८. |
| ५०. | महाराष्ट्र संत कवयित्री | : | लेखक - ज.र. आजगावकर. आवत्ती १९६९. प. ११०. |
| ५१. | तत्रैव | : | प. ११४. |
| ५२. | प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास तिसरा खंड | : | लेखक ल.रा. पांगारकर. आ.शके. १८६१. प. १६. |
| ५३. | तत्रैव | : | प.१९. |
| ५४. | श्रीसकल संत गाथा खंड दसरा | : | अ.क्र.१२. प. ३ |
| ५५. | प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास तिसरा खंड | : | लेखक - ल.रा. पांगारकर. आवत्ती मुंबई शके १८६१. प. १९. |
| ५६. | ज्ञानेश्वरी अध्याय ९ वा | : | ओवी क्र.२ प. १. संपादक - पां.ना. कुलकर्णी. प्रकाशक- फडके प्रकाशन. प्रथमावत्ती - डिसेंबर १९९४. |